
क्र. १५४ पहिले वर्ष

२३ जुलै २०२३

# रविवारची  उपासना

## सामान्यकाळातील सोळावा रविवार

### प्रस्तावना

आपल्यापैकी कुणीही हा परिपूर्ण नाही. प्रत्येकामध्ये गुणदोष आहेत हे आपणांस आजच्या शुभवर्तमानात स्पष्ट होत आहे. जग हे एखाद्या शेताप्रमाणे आहे, जेथे गहू आणि निंदण एकत्र वाढते आणि म्हणून ख्रिस्त आपणांस निंदण उपटून काढण्यास आवाहन करत आहे. बऱ्याच वेळेला आपण पुरुषाप्रमाणे वागत असतो. दुसऱ्यांची चूक काढण्यास आपण सदैव तयार असतो. आपण दुसऱ्यांचा न्याय करतो. आता आपण आत्मपरीक्षण करू या की, आपल्या अंत:करणरूपी शेतात पीक वाढत आहे की, निंदण वाढत आहे. जर निंदण वाढत असेल तर ते उपटून काढावे. आपल्या अंत:करणात सद्गुणाचे पीक वाढीस लागावे म्हणून ह्या पवित्र मिस्साबलीत एकमेकांसाठी परमेश्वराकडे प्रार्थना करूया.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे प्रभो, तुझ्या प्रजाजनांवर दया कर. तुझ्या कृपादानांचा आम्हावर वर्षाव कर आणि श्रध्दा, आशा व प्रीतीभावनेने तुझी सेवा करण्यास आम्हाला सदैव अधीर ठेव. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

**प्रभूशब्द विधी**

### पहिले वाचन

**ज्ञानग्रंथ या पुस्तकातून घेतलेले वाचन १२:१३, १६–१९**

**"तू पापांची क्षमा करतोस."**

सर्व वस्तू तुझ्या अधिकाराखाली आहेत आणि ज्याच्यामुळे तुला तुझ्या निर्णयांचे समर्थन करावे लागेल असा अन्य परमेश्वर नाही. न्यायाचे उगमस्थान तुझ्या अधिकारात आहे, तू सर्वांचा प्रभू आहेस; म्हणूनच तू प्रत्येकाला दया दाखवतोस. तुझ्या सर्वाधिकाराविषयी जेव्हा लोक संशय घेतात तेव्हा तू त्यांना आपल्या सामर्थ्याचे दर्शन घडवतोस. तुझा सर्वाधिकार जाणूनही जे लोक त्याच्याकडे दुर्लक्ष करतात त्यांना तू शिक्षा करतोस. तू सर्वाधिकारी असलास तरी दयाळू न्यायाधीश आहेस, इच्छा होईल तेव्हा तू कारवाई करू शकतोस; तथापि मोठ्या सहनशक्तीने तू आम्हांवर राज्य करतोस. ह्या तुझ्या वर्तनाने तू तुझ्या लोकांना असे शिकवले आहेस की, नीतिमान माणसाने नेहमी दयाळू असावे. तुझ्या लोकांना त्यांच्या पापांबद्दल पश्चात्ताप करण्याची संधी देऊन तू त्यांना महान आशा दाखवली आहेस.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**८५:५–६, ९–१०,१५–..१६अ**

प्रतिसाद: **हे प्रभो, तू उत्तम आणि क्षमाशील आहेस.**

१. हे प्रभो, तू उत्तम आणि क्षमाशील आहेस आणि तुझा धावा करणाऱ्या सर्वावर विपुल दया करणारा आहेस. हे परमेश्वरा, माझ्या प्रार्थनेकडे कान दे. माझ्या काकुळतीच्या वाणीकडे लक्ष दे.

२. हे प्रभो, तू उत्पन्न केलेली सर्व राष्ट्रे येऊन तुझ्या पाया पडतील. तुझ्या नामाचा महिमा गातील; कारण तू थोर आणि अद्भुत कृत्ये करणारा आहेस; तूच केवळ देव आहेस.

३. तरी हे प्रभो, तू सत्य आणि दयाळू देव आहेस; मंदक्रोध दयामय आणि सत्यसंपन्न आहेस. तू माझ्याकडे वळून माझ्यावर कृपा कर.

### दुसरे वाचन

**पौलाचे रोमकरांस पत्र यातून घेतलेले वाचन ८:२६–२७**

**"पण आत्मा अनिर्वाच्या कण्हण्याने आपणासाठी मध्यस्थी करतो."**

आपण यथायोग्य प्रार्थना कशासाठी केली पाहिजे हे आपल्याला ठाऊक नाही म्हणून आत्मा आपल्या अशक्तपणात आपल्याला हातभार लावतो; आणि आत्मा स्वत: अनिर्वाच्य कण्हण्याने आपणासाठी मध्यस्थी करतो. पण अंतर्यामे पारखणाऱ्याला त्या आत्म्याचा मनोभाव काय हे ठाऊक आहे, कारण हा आत्मा पवित्रजनांसाठी देवाच्या मर्जीप्रमाणे मध्यस्थी करतो.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**१ शमु.३:९, योहान ६:२८**

**आलेलुया, आलेलुया!**

हे परमेश्वरा, बोल तुझा दास ऐकत आहे; सार्वकालिक जीवनाची वचने आपणाजवळ आहेत.

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**मत्तयलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन १३:२४–४३**

**"कापणीपर्यंत दोन्ही बरोबर वाढू द्या."**

संक्षिप्त रुपासाठी (चरण २४–३०) कंसातील पाठ वापरता येतील.

(येशूने लोकसमुदायांपुढे दुसरा एक दाखला मांडला; कोणा एका मनुष्याने आपल्या शेतात चांगले बी पेरले, त्याच्यासारखे स्वर्गाचे राज्य आहे. लोक झोपेत असताना त्याचा वैरी येऊन गव्हामध्ये निंदण पेरुन गेला. पण जेव्हा पाला फुटला आणि दाणे आले तेव्हा निंदणही दिसले. तेव्हा घरधन्याच्या दासांनी येऊन त्याला म्हटले, "महाराज, आपल्या शेतामध्ये चांगले बी पेरले ना? तर मग त्यात निंदण कोठून आले?" तो त्यांना म्हणाला, "हे काम कोणा वैऱ्याचे आहे." दासांनी त्याला म्हटले, "आम्ही जाऊन ते जमा करावे अशी आपली इच्छा आहे काय?" तो म्हणाला, "नाही, तुम्ही निंदण गोळा करताना त्याबरोबर कदाचित गहूही उपटाल. कापणीपर्यंत दोन्ही बरोबर वाढू द्या; मग कापणीच्यावेळेस मी कापणाऱ्यांस सांगेन की, पहिल्याने निंदण गोळा करा आणि जाळण्यासाठी त्याच्या पेंढ्या बांधा, परंतु गहू माझ्या कोठारात साठवा.) त्याने त्यांच्यापुढे दुसरा एक दाखला मांडला, "स्वर्गाचे राज्य मोहरीच्या दाण्यासारखे आहे. तो कोणा एका मनुष्याने घेऊन शेतात लावला. तो तर सर्व दाण्यांमध्ये लहान आहे; तरी वाढल्यावर सर्व भाज्यांपेक्षा मोठा होऊन त्याचे असे झाड होते की, आकाशातील पाखरे येऊन त्यांच्या फांद्यात वस्ती करतात."

त्याने त्यांना आणखी एक दाखला सांगितला, ''स्वर्गाचे राज्य खमिरासारखे आहे; ते एका स्त्रीने घेऊन तीन मापे पीठामध्ये लपवून ठेवले, त्यामुळे ते सर्व पीठ फुगून गेले.'' ह्या सर्व गोष्टी येशूने दाखल्यांनी लोकसमुदायांना सांगितल्या आणि दाखल्यावाचून तो त्यांच्याबरोबर काही बोलला नाही, संदेष्ट्यांच्याद्वारे जे सांगितले ते पूर्ण व्हावे म्हणून त्याने दाखले सांगितले ते असे. ''मी आपले तोंड उघडून दाखले देईन, जगाच्या स्थापनेपासून जे गुप्त ते प्रगट करीन.'' नंतर तो लोकसमुदायास निरोप देऊन घरात गेला. तेव्हा त्याचे शिष्य त्याच्याकडे येऊन म्हणाले, ''शेतातल्या निंदणाच्या दाखल्याची आम्हांला फोड करुन सांगा.'' त्याने उत्तर दिले की, ''चांगले बी पेरणारा हा मनुष्याचा पुत्र आहे. शषत हे जग आहे; चांगले बी राज्याचे पुत्र आहेत, निंदण हे दृष्टाचे पुत्र आहेत, ते पेरणारा वैरी हा सैतान आहे, कापणी ही युगाची समाप्ती आहे आणि कापणारे हे देवदूत आहेत. तेव्हा जसे निंदण गोळा करून अग्नीत जाळतात तसे युगाच्या समाप्तीस होईल. मनुष्याचा पुत्र आपल्या दूतांना पाठवील आणि ते सर्व अडखळविणाऱ्यांना आणि अनाचार करणाऱ्यांना त्याच्या राज्यातून जमा करून त्यांना अग्नीच्या भट्टीत टाकतील; तेथे रडणे आणि दात खाणे चालेल. आणि नीतिमान आपल्या पित्याच्या राज्यात सूर्यासारखे प्रकाशतील. ज्याला कान आहेत ते ऐको.''

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रस्ताविक**

बंधू आणि भगिनी म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्विकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

आपला प्रतिसाद असेल – **हे प्रभा, उत्तम मेंढपाळा, आमच्या प्रार्थना ऐक.**

१. आपले परमगुरू, महागुरू, धर्मगुरू व इतर विशेष करून ज्यांना कळपाचे नेतृत्व करण्यासाठी अभिषिक्त केलं आहे त्यांनी आपल्या सर्वस्वाने ख्रिस्तसभेत आध्यात्मिक विकासासाठी झटावे म्हणून प्रार्थना करूया.

२. आपले पालक व प्रापंचिक नेत्यांनी त्यांच्या छोट्या बालकांच्या व तरुणांच्या भल्यासाठी झटावे म्हणून आपण प्रार्थना करुया.

३. तरुण वर्गाने आपल्या नेत्यांमध्ये व वरिष्ठांमध्ये खरे मेंढपाळ शोधण्याचा प्रयत्न करावा म्हणून आपण प्रार्थना करूया.

४. आता आपण थोडावेळ शांत राहून वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करूया.

## समारोप

हे स्वर्गीय पित्या, तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक. आमच्या श्रध्देमधील उणीवा तुझ्या प्रेमाने भरून काढ. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, तुझ्या सन्मानासाठी ही दाने आम्ही तुला अर्पण करीत आहोत. या दानांद्वारे आम्हांला तुझ्याजवळ आकर्षून घे. तू आम्हांला दिलेल्या ह्या परिपूर्ण समर्पणाचा स्वीकार कर. आबेलच्या समर्पणाप्रमाणे आमचेही हे समर्पण आशीर्वादित कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे दयाळू बापा, या दिव्य रहस्यांद्वारे आम्हांला नवे जीवनध्येय दे व शेवटी परिपूर्ण अशा नवजीवनात प्रवेश दे. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## चिंतन

''कोणाचे दोष काढू नका म्हणजे कोणी तुमचे दोष काढणार नाहीत.'' अशी शिकवण प्रभू येशू ख्रिस्ताने आपल्याला दिलेली आहे. मात्र पुष्कळवेळा योग्य पदासाठी योग्य व्यक्ती नियुक्त करता यावी म्हणून व्यक्तीच्या गुणदोषांसह तिच्या व्यक्तिमत्त्वाचे व चारित्र्याचे मूल्यमापन करावे लागते. अशा परिस्थितीत अनवधानाने आपल्याकडून व्यक्तीचा न्याय-इन्साफ केला जाण्याचा धोका असतो.आजची वाचने त्यासंदर्भात आपल्यासमार तीन चिंतने सादर करतात :

**अ) न्यायदानाला नैतिकतेची बैठक असायला हवी :** आजच्या पहिल्या वाचनात (ज्ञानग्रंथ १२:१३, १६-१९) परमेश्वर नीतिने आपला न्याय करतो असे सांगण्यात आलेले आहे. देवाची न्यायदान पध्दती आणि मानवाची न्यायदान पध्दती ह्यांच्यात एक मूलभूत फरक आहे. मनुष्य बाह्यस्वरूप पाहतो. परमेश्वर अंत:करण पारखतो. न्यायदान करताना सार्वजनिक हित हा उदात्त हेतू नजरेसमोर ठेवून नीतिने न्याय करणे गरजेचे असते.

**ब) न्यायदानाला प्रार्थनेची बैठक असायला हवी :** आजच्या दुसऱ्या वाचनात (रोम.८:२६-२७) संत पौल श्रध्दावंताठायी पवित्र आत्म्याचे कार्य कसे सुरू असते त्याविषयीचे धर्मशिक्षण देतो. आपण यथायोग्य प्रार्थना कशासाठी केली पाहिजे हे कधी कधी आपल्याला ठाऊक नसते. अशावेळी आत्मा आपल्या अशक्तपणात आपल्याला हातभार लावतो. ज्ञान, शहाणपण आणि समंजसपणा ह्यांचा उगम असलेल्या पवित्र आत्म्याकडे न्यायबुध्दी मागूनच न्यायदान करणे उचित ठरेल.

**क) न्यायदानाला संयमाची बैठक असायला हवी :** आजच्या शुभवर्तमानात (मत्तय १३:२४-४३) प्रभू येशू गहू आणि निंदण ह्यांचा दाखला देतो. गहू हे माणसाच्या चांगुलपणाचे तर निंदण हे त्याच्यातील दुष्ट प्रवृत्तीचे प्रतीक आहे. माणसाचा न्याय करताना त्याच्यातील दुष्ट प्रवृत्ती दूर करताना त्याच्यातील चांगुलपणालाही तडा जाण्याची शक्यता असते. दाखला आणि स्पष्टीकरण ह्यांच्यामध्ये खमीर आणि मोहरीचा दाणा ह्यांचे दाखले देण्यात आलेले आहेत. चांगुलपणा बीजरूपात असतो. त्याचे रक्षण केल्यास त्याचा महाकाय वटवृक्ष होऊ शकतो. मात्र त्यासाठी संयमाची गरज असते.

**आत्मपरीक्षण :** इतरांचा न्याय करताना मी नैतिकता, प्रार्थना आणि संयम ह्यांची बैठक कितपत साधतो?

| ऑगस्ट २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | चौथा सप्ताह |
|---|---|---|
| सोम २४ | सं फ्रान्सिस सोलानो (हि) | : निर्गम १४:५-१८/मत्तय १२: ३८-४२ |
| मंगळ २५ | सं याकोब (जेम्स) प्रेषित (तां) | : २ करिंथ.४:७-१५/मत्तय २०:२०-२८ |
| बुध २६ | सं जोकीम व सं आन्ना (पां) | : निर्गम १६:१-५, ९-१५/मत्तय १३:१-९ |
| गुरू २७ | सं इनोसेंट पहिले (हि) | : निर्गम १९:१-२, ९-११, १६-२०/मत्तय १३:१०-१७ |
| शुक्र २८ | सं अल्फोन्सा (हि) | : निर्गम २०:१-१७/मत्तय १३:१८-२३ |
| शनि २९ | बेथानीची सं मार्था (पां) | : निर्गम २४:३-८/मत्तय १३:२४-३० |